सहकारी संस्थांमधील अपहार/ गैरव्यवहाराच्या अनुषंगाने सादर करावयाच्या विनिर्दिष्ट अहवालाची रचना व कार्यपध्दतीबाबत....

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय.**

जा.क्र.सआ/लेखापरीक्षण/परिपत्रक/चाचणी लेखापरीक्षण/ ७१३१ /२०२१, दिनांक २२ /०९ /२०२१

**: परिपत्रक :**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१( ५)(ब) मधिल प्रथम परंतुकांन्वये, लेखापरीक्षक आपल्या लेखापरीक्षण अहवालात कोणतीही व्यक्ती, लेख्यांसंबंधातील कोणत्याही अपराधाबद्दल दोषी आहे या निष्कर्षाप्रत आला असेल, तर तो लेखापरीक्षण अहवाल सादर केल्याच्या दिनांकापासुन १५ दिवसांच्या आत निबंधकाकडे विनिर्दिष्ट अहवाल दाखल करील. संबंधित लेखापरीक्षक निबंधकाची लेखी परवानगी प्राप्त केल्यानंतर अपराधाचा प्रथम माहिती अहवाल दाखल करील, **जो लेखापरीक्षक अपराधाचा प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यास कसुर करील तो अनर्हतेस पात्र ठरेल आणि त्याचे नाव लेखापरिक्षकांच्या नामतालिकेतुन काढून टाकले जाण्यास पात्र ठरेल आणि तो निबंधकास योग्य वाटेल अशा कोणत्याही अन्य कारवाईस देखील पात्र ठरेल अशी तरतुद आहे.**

सहकारी संस्थांना त्यांचे लेखापरीक्षक निवडीची स्वायतत्ता प्रदान केल्याने, सहकारी संस्थांचा कल प्रमाणित लेखापरीक्षक, सनदी लेखापाल व परिव्यय लेखापाल यांची नियुक्ती करण्याकडे असून, संबंधित लेखापरीक्षक लेखापरीक्षणावेळी त्याचे निदर्शनास आलेल्या अनेक गंभीर मुद्यांबाबत जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे दिसुन आले आहे. अनेक वेळेस संबंधित लेखापरीक्षक अपहार/गैरव्यवहार निदर्शनास आल्यानंतर विनिर्दिष्ट अहवाल सादर करताना योग्य ती दक्षता घेत नाहीत किंवहूना विनिर्दिष्ट अहवालच दाखल करीत नाहीत. तसेच अनेकदा विनिर्दिष्ट अहवालात अपहारास जबाबदार असणा-या व्यक्तींची जबाबदारी योग्य पध्दतीने निश्चित करीत नाहीत. पर्यायाने कायदेशीर ऊणीवा राहिल्याने पुढील न्यायालयीन कार्यवाहीमध्ये जबाबदार व्यक्तींविरुध्द गुन्हा सिध्द होत नाही, किंवा अपहारास जबाबदार व्यक्तींना संशयाचा फायदा मिळून अशा व्यक्तींना योग्य ती शिक्षा होत नाही. यासाठी राज्यातील सर्व लेखापरीक्षकांना विनिर्दिष्ट अहवालाची रचना व त्या अनुषंगिक कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

## विनिर्दिष्ट अहवालाची रचना

१. **निबंधकास द्यावयाचे पत्र-** सदर पत्रामध्ये कोणत्या सहकारी संस्थेचे, कोणत्या कालावधीचे, कोणत्या आदेशान्वये, कोणत्या प्रकारचे लेखापरीक्षण केलेले आहे, तसेच कोणत्या तारखेस लेखापरीक्षण अहवाल सादर केलेला आहे याबाबत तपशील नमूद करावा. तसेच लेखापरीक्षणावेळी निदर्शनास आलेली अपहाराची रक्कम नमूद करुन, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१(५)(ब) अन्वये पुढील कार्यवाहीसाठी विनिर्दिष्ट अहवाल सादर करीत असल्याबाबत स्पष्टपणे नमूद करावे.

Scanned with CamScanner

२. **अनुक्रमणिका** - विनिर्दिष्ट अहवाल व त्याअहवालासोबत अपहाराच्या अनुषंगाने जोडण्यात आलेल्या पुष्ट्यर्थ कागदपत्रांना अनुक्रमांक देऊन, अहवालातील मुद्यांचे संक्षिप्त शीर्षक नमूद करुन अनुक्रमणिका अहवालासोबत जोडणे आवश्यक आहे.

३. **प्रास्ताविक :-**

- संस्थचे नाव, लेखापरीक्षण कालावधी, लेखापरीक्षणाचा प्रकार, लेखापरीक्षण कोणत्या आदेशान्वये केले आहे, तसेच निबंधकाने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम ६९ (६)(v) नुसार दिलेल्या इतर सुचनांनूसार कामकाज करीत असल्यास त्या अनुषंगाने तपशील किंवा अन्य सुचना/निर्देश , लेखापरीक्षण अहवाल सादर केल्याच्या पत्राचा तपशील, या सर्व बाबी सविस्तरपणे नमूद कराव्यात.

४. **अपहाराची कार्यपद्धती ( Modus Operandi) :-**

- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१(१)(इ) मधील तरतुदींनुसार, लेखापरीक्षणावेळी निदर्शनास आलेल्या आर्थिक अनियमितता, निधिचा गैरविनियोग व अफरातफर अथवा फसवणूक याबाबत अन्वेषण करुन, अपहाराची कार्यपध्दती, अपहारातील सहभाग व अपहारीत रक्कम यांचा सर्व तपशील मुळ लेखापरीक्षण अहवालात नमूद करणे अनिवार्य आहे. तसेच निदर्शनास आलेल्या अपहाराच्या अनुषंगाने विनिर्दिष्ट अहवालातही स्वयंस्पष्ट अभिप्राय नमूद करणेत यावेत. तसेच विनिर्दिष्ट अहवाल सादर करताना तो संस्थेच्या लेखापरिक्षण अहवालाशी संबंधित असल्याने मुळ लेखापरीक्षण अहवाल व विनिर्दिष्ट अहवालांमधील, अपहाराशी निगडीत असलेल्या तपशिलांमध्ये संदिग्धता अथवा विसंगती राहणार नाही याची दक्षता घ्यावी.
- अपहाराची कार्यपध्दती नमूद करताना, अपहार ज्या पध्दतीने झालेला आहे, त्या पध्दतीनुसार अपहाराचे प्रकार निश्चित करुन, सदर प्रकारास समर्पक शीर्षक देवून, या शीर्षकाखाली सदर अपहाराचा सविस्तर तपशिल नमूद करावा. (उदा: कर्जखाती जमा झालेल्या रक्कमा जमा न घेता केलेला अपहार, रोख शिल्लक घटवून केलेला अपहार, ठेवी नसताना ठेवतारण कर्ज अदा करुन केलेला अपहार, )
- अपहाराच्या कार्यपध्दतीमध्ये भारतिय दंड संहितेमधिल तरतुदींनुसार अपहार/गैरव्यवहार /फसवणूक/विश्वासघात/बनावटगिरी/खोटी कागदपत्रे बनविणे/चोरी, इत्यादीपैकी कोणकोणत्या प्रकाराने अपहार झालेला आहे, त्याबाबत स्वयंस्पष्ट अभिप्राय नमूद करणे अत्यावश्यक आहे. या अनुषंगाने अभिप्राय नमूद करताना संबंधित व्यक्तीने गैरहेतूने अपहार केलेला असल्याचे स्पष्ट नमूद करणे आवश्यक आहे.
- अपहाराच्या कार्यपध्दतीमध्ये ज्या-ज्या रकमांचा अपहार झालेला आहे, त्या त्या रकमांच्या अनुषंगाने अपहार कोणत्या तारखेस झालेला आहे, अपहार कसा घडलेला आहे, सदर अपहार कोणत्या व्यक्तिंनी कोणत्या कार्यकक्षेत केलेला आहे, या सर्व बाबी स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. तसेच सदरच्या अपहाराच्या पुष्ट्यर्थ जी कागदपत्रे विनिर्दिष्ट अहवालासोबत जोडलेली आहेत त्या कागदपत्रांचे क्रमांक अपहाराचा तपशील नमूद करताना त्या-त्या प्रकारामध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात यावा.

५. **अपहाराची जबाबदारी :-**

- मा. न्यायालयात विनिर्दिष्ट अहवालाचे अनुषंगाने दोषारोप सिध्द करण्याची जबाबदारी ही फिर्यादी या नात्याने संबंधित लेखापरीक्षकाची असल्याने अपहाराची जबाबदारी निश्चित करताना योग्य ती दक्षता घेणे अत्यावश्यक आहे.
- अपहाराची जबाबदारी निश्चित करताना ती अपहाराच्या प्रकार व रक्कम निहाय निश्चित करणे आवश्यक आहे. संबंधित व्यक्तिने कोणत्या अधिकार कक्षेत कामकाज केलेले आहे?, त्या अनुषंगाने लेखी आदेश आहेत काय? संस्थेच्या पोटनियमानुसार निश्चित स्वरुपाची

Scanned with CamScanner

- जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे काय? या अनुषंगाने तपशिल नमूद करावा तसेच त्या पुष्ट्यर्थ आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे विनिर्दिष्ट अहवालासोबत जोडून जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.
- अपहाराची जबाबदारी निश्चित करताना सदर जबाबदारी ही वैयक्तिकरित्या आहे किंवा सामुहिकरित्या आहे या अनुषंगाने स्वयंस्पष्ट अभिप्राय नमूद करणे आवश्यक आहे.
- अपहाराबाबत सबळ पुरावे असल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस त्यास जबाबदार धरणे संयुक्तिक नाही. ज्या अपहार प्रकरणी संचालक मंडळाने हेतुपुरस्सर नियमबाह्य निर्णय घेतल्यामुळे किंवा पदाचा लाभ घेऊन फायदा घेण्याच्या उद्देशाने निर्णय घेतल्याचे निदर्शनास येत असल्यास तसेच त्या अनुषंगाने सबळ पुरावे उपलब्ध होत असल्यास अपहाराच्या जबाबदारीबाबत स्वयंस्पष्ट निष्कर्ष नमूद करावेत.
- अपहाराची जबाबदारी निश्चित करण्यापुर्वी, लेखापरीक्षकाने संबंधित व्यक्तींना, नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार त्यांचे म्हणणे सादर करण्याची योग्य संधी देणे आवश्यक आहे. तसेच संबंधित व्यक्तींनी सादर केलेला त्यांचा खुलासा व कागदपत्रे यांची शहानिशा करुन, लेखापरीक्षकाने अपहार/गैरव्यवहाराच्या जबाबदारीच्या अनुषंगाने योग्य त्या निष्कर्षाप्रत येवून स्वयंस्पष्ट अभिप्राय नमूद करणे आवश्यक आहे.

६. **अपहाराचा गोषवारा :-** विनिर्दिष्ट अहवालाच्या शेवटच्या पृष्ठावर लेखापरीक्षण अहवालात निदर्शनास आलेल्या अपहाराचा गोषवारा नमूद करावा सदर गोषवारा नमूद करताना त्यामध्ये कोणकोणत्या प्रकाराने, किती रकमेचा अपहार झालेला आहे तसेच सदर अपहारास रक्कमनिहाय कोणकोणत्या व्यक्ती जबाबदार आहेत याबाबतचा तपशिल संक्षिप्त स्वरुपात नमूद करावा.

७. **पुराव्यापुष्ट्यर्थ कागदपत्रे -** अपहार सिध्द करण्यासाठी पुराव्यापुष्ट्यर्थ आवश्यक असणा-या कागदपत्रांच्या प्रती संस्थेकडून प्रमाणित करुन घेऊन, सदर कागदपत्र विनिर्दिष्ट अहवालासोबत जोडण्यात यावेत. सदर कागदपत्रांवर अनुक्रमांक नमूद करावेत. विनिर्दिष्ट अहवालात नमूद केलेल्या प्रकारनिहाय अपहारांच्या बाबींसमोर अपहाराच्या अनुषंगाने लागु असणा-या पुष्ट्यर्थ कागदपत्रांचा अनुक्रमांक नमूद करावा. ज्यामुळे निबंधक/ तपासी अधिकारी यांना झालेल्या अपहाराची पडताळणी करणे सहज सुलभ होईल.

८. विनिर्दिष्ट अहवालावर कार्यवाही होण्यासाठी प्रदीर्घ कालावधी लागत असल्याने सदर अहवाल योग्य पध्दतीने बांधणी करुन सादर करण्यात यावा.

९. **निबंधकाने करावयाची कार्यवाही -** विनिर्दिष्ट अहवाल प्राप्त झाल्यानंतर, संबंधित निबंधकाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८१(५)(ब) मधिल तरतुदींनुसार लेखापरीक्षकास प्रथम माहिती अहवाल (FIR) दाखल करण्यास मान्यता देण्यापुर्वी विनिर्दिष्ट अहवालानुसार नमूद केलेला अपहार व त्यानुषंगाने निश्चित केलेल्या जबाबदारीची सर्वकष पडताळणी करुनच मान्यता द्यावी. ज्याप्रकरणी अपहार व त्या अनुषंगिक जबाबदारीबाबत काही संधिग्धता/अपुर्तता/उणिवा असल्यास त्या अनुषंगाने संबंधित लेखापरीक्षकास, सदर बाबींची पुर्तता करुन विनिर्दिष्ट अहवाल फेरसादर करण्याचे निर्देश द्यावेत व निबंधकाची खात्री झाल्यानंतरच त्यांनी अशी मान्यता द्यावी.

१०. विनिर्दिष्ट अहवालाच्या आधारे गुन्हा दाखल झाल्यानंतर, मा.न्यायालयात चार्जशीट दाखल झाले किंवा कसे, न्यायालयाचा अंतिम निर्णय, निर्णयानुसार झालेली कार्यवाही या अनुषंगाने जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी, ज्या राज्यस्तरीय / विभागस्तरीय संस्थांचे मुख्यालय त्यांच्या जिल्ह्यात आहे अशा संस्थांचे व जिल्ह्यातील अन्य सर्व संस्थांच्या अनुषंगाने दाखल विनिर्दिष्ट अहवालावरील पुढील कार्यवाहीबाबतची नोंदवही तयार करुन वेळोवेळी त्याबाबतच्या अद्यावत नोंदी ठेवणे आवश्यक आहे. तसेच ज्या न्यायालयीन प्रकरणी शासनाच्या विरोधात निकाल गेलेला

Scanned with CamScanner

आहे, त्याबाबत अपील दाखल करण्याची आवश्यकता असल्यास तसा प्रस्ताव निबंधकास सादर करावा.

११. विनिर्दिष्ट अहवालाच्या आधारे, झालेल्या अपहार प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची कारवाई केली जाते. तथापि, अशा अपहारीत रकमांमूळे संस्थांचे आर्थिक नूकसान होत असल्याने या आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित होऊन रक्कम वसुल होण्यासाठी लेखापरीक्षकाने संबंधित निबंधकास **विशेष अहवालही** सादर करावा.

(अनिल कवडे )
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

<u>प्रत पुढील उचित कार्यवाही व उपाययोजनेस्तव -</u>

१. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन, लेखापरीक्षण) सर्व
२. सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) मुंबई.
३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
४. जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था (सर्व)
५. उपनिबंधक सहकारी संस्था (मत्स्य) मुंबई.
६. इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (WIRC), आय. सी.ए.आय. टॉवर, प्लॉट नं. सी.-४०, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पुर्व), मुंबई — ४०० ०५१.
७. इन्स्टिटयुट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडिया (WIRC), रोहित चेंबर्स, ४ था मजला, जन्मभुमी मार्ग, फोर्ट मुंबई ४०० ००१.
८. प्रमाणित लेखापरीक्षकांच्या संघटना.

<u>प्रत माहितीस्तव सविनय सादर -</u>

१. मा.अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग ,मंत्रालय, मुंबई .

Scanned with CamScanner

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या पुणे, संचलित

तात्यासाहेब मोहिते सहकार प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर व सहकार खाते

यांचे वतीने

# प्रशिक्षण वर्ग

# सहर्ष स्वागत

प्रा.एस.टी.जाधव.

---

## कलम - १४४ - ३ अ

व्याख्या. ज्या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट तिच्या सदस्यांना कर्ज देणे आणि सदस्यांकडून ठेवी स्विकारणे.

संस्था समावेश.

* नागरी सहकारी पतसंस्था
* ग्रा.बि. कृषी सहकारी पतसंस्था
* पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्था
* राज्य शासन राजपत्रात प्रसिध्द केलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाव्दारे याबाबत वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशी संस्था किंवा संस्थाचा वर्ग

---

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१

- भारतात सहकारी चळवळ सुरुवात १९०४
- सन १९२५ प्रांतीक कायदा
- १ मे १९६० महाराष्ट्र राज्य निर्मिती, कायदा नावांत बदल
- ९ मे १९६१ महाराष्ट्र विधान सभेमध्ये कायदा पारीत
- २६ जानेवारी १९६२ पासून सहकारी कायदा अमंलबजावणी
- कलमे - १६८ नियम - ११० विभाग - १ ते १४

---

## नियामक मंडळ.

कलम १४४-१३ अ, अन्वये गठीत केलेले मंडळ.(दि. ३१ जानेवारी २०१९ रोजी गठीत)

## स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधी.

कलम १४४-२५ अ, अन्वये गठीत करण्यात आलेला निधी.

---

## प्रकरण अकरा - १ अ

# बिगर कृषी सहकारी पतसंस्था

## कलम - १४४ - २ अ

बिगर कृषी सहकारी पतसंस्थाना लागू

दिनांक. २२ फेब्रुवारी २०१९ पासून लागू

---

## कलम - १४४ - ४ अ

बिगर कृषी सहकारी पतसंस्थाना करता येणारी कामे.

१. ठेवी स्विकारणे, कर्ज देणे, रक्कमा उसनी देणे, कर्जाची व अगावू रक्कमांची तडजोड करणे, सुरक्षित ठेवघरे पुरविणे.
२. संस्था ताब्यात येणाऱ्या मालमत्तेचे व्यवस्थापन करणे, विक्री करणे, संपादित करणे.
३. मालमत्तेवर मालकी हक्क संपादित करणे, धारण करणे.
४. संस्था प्रयोजनासाठी आवश्यक इमारत किंवा बांधकामे संपादित करणे, त्याचे परिरक्षण करणे व त्यामध्ये फेरफार करणे.
५. संस्था मालमत्तेचा विकास करणे, भाडेपट्ट्याने देणे, विल्हेवाट लावणे.

Scanned with CamScanner

६. संस्था सदस्याला दिलेल्या कर्जाचे वसुली प्रयोजन करणे.

७. संस्था कामकाजाचे प्रचालन किंवा अभिवृध्दी यासाठी आनुषंगिक किंवा हितावह गोष्टी करणे.

८. त्या त्या वेळी अमंलात असलेल्या कायद्यानुसार निबंधकाचे पुर्व मंजुरीने मत्तेचे पुनर्रचना करण्याचे कार्य स्वतः हाती घेणे किंवा त्याकरता सहाय्य करणे.

९. राज्य शासन राजपत्रातील अधिसुचनेव्दारे विनिर्दिष्ट करील असे व विधीसमंत असेल असे अन्य कोणतेही कामकाज.

टीप. वरील कामकाजा व्यतिरिक्त इतर कोणतेही काम संस्था करीत असल्यास उक्त सुधारणा अधिनियमाचे प्रारंभाच्या दिनांकापासून १८ महिणेचे आत ( दि. २१ ऑगस्ट २०२० पर्यंत ) पुर्ण करावे. विहीत मुदतीत पुर्ण न झाल्यास निबंधकाचे परवानगीने १२ महिणे मुदत वाढ ( दि. २१ ऑगस्ट २०२१ पर्यंत ) घेता येईल.( ३० महिण्यामध्ये पुर्ण अपेक्षित)

## कलम - १४४ - ८ अ

प्रशासनिक व आस्थापना खर्च यावरील मर्यादा.

दि. १० मे, २०१९ चे नियामक मंडळ परिपत्रकानुसार खेळते भांडवलाचे २ टक्के पेक्षा अधिक असणार नाही.

खेळते भांडवल = भागभांडवल + राखीव व नफा विभागणी मधून निर्माण निधी + ठेवी + बाहेरील कर्ज

प्रशासनिक व आस्थापना खर्च = नफा तोटा पत्रकातील खर्च बाजू मधील दिलेले व्याज व कायदेशीर तरतुदी वजा जाता राहीलेली रक्कम.( कायदेशीर तरतुदी = एन पी ए व थकव्याज तरतुद )

## कलम - १४४ - ५ अ

सदस्य नसलेल्या व्यक्तीकडून ठेवी स्विकारणेस प्रतिबंद.

संस्था सदस्य नसलेल्या व्यक्तीकडून ठेवी स्विकारणार नाही.

( सदस्य - यामध्ये नाममात्र सदस्य अंतर्भुत नाही )

पुर्वी ठेवी स्विकारल्या असल्यास, दि. २२ फेब्रुवारी २०१९ च्या प्रारंभापासून दोन वर्षामध्ये ( दि. २१ फेब्रुवारी २०२१ पर्यंत) परत करेल किंवा त्याला सभासद करेल

(दि. २८ मार्च, २०२२ रोजीच्या बदलानुसार पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या सेवानिवृत्त सभासदास (माजी सभासद) नाममात्र सभासद करून पगारदार संस्थेला ठेवी स्विकारता येतील)

## कलम - १४४ - ९ अ

रोख राखीव निधी.(सी.आर.आर)

दि. १० मे, २०१९ चे नियामक मंडळ परिपत्रकानुसार
दि. १ जुलै, २०१९ पासून लागू,
किमान २ टक्के व कमाल ५ टक्के

दि. ३० नोव्हेंबर,२०१९ चे नियामक मंडळ परिपत्रकानुसार
दि. ०१ जानेवारी, २०२० पासून,
किमान १ टक्के व कमाल ५ टक्के

* विवरण पत्रके तिमाही अखेरच्या १५ व्या दिवसापुर्वी नियामक मंडळास सादर *

## कलम - १४४ - ६ अ

व्यापारास प्रतिबंध.

संस्था माल खरेदी विक्री किंवा माल विनिमय यामध्ये प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे व्यवहार करणार नाही.

## कलम - १४४ - ७ अ

संस्थेस आवश्यक नसेल अशा मालमत्तेची विल्हेवाट लावणे.

उक्त सुधारणा अधिनियमाचे प्रारंभाच्या दिनांकापासून ७ वर्षाच्या आत ( दि. २१ फेब्रुवारी २०२६ पर्यंत )मालमत्तेची विल्हेवाट लावणे निबंधकाचे परवानगीने ३ वर्ष ( दि. २१ फेब्रुवारी २०२९ पर्यंत ) मुदत वाढ घेता येईल.

## कलम - १४४ - १० अ

तरलता निधी. (एस.एल.आर)

दि. १० मे, २०१९ चे नियामक मंडळ परिपत्रकानुसार
दि. १ जुलै, २०१९ पासून लागू,
किमान २५ टक्के व कमाल ४० टक्के

(कलम- ७० मधील तरतुदी प्रमाणे बँक गुंतवणूक)

Scanned with CamScanner

## कलम - १४४ - ११ अ

कर्ज व अग्रीम देण्यावरील निर्बंध.

अ. कलम- ४४ प्रमाणे समभागांच्या प्रतिभूतीवर कोणतेही कर्ज व अग्रीम मंजूर करणार नाही.

ब. संचालक मंडळ,त्यांचे नातेवाईक व त्यांचे भागिदारी याना जामीन कर्ज मिळणार नाही किंवा मंजुरीची हमी देता येणार नाही.

पुर्वी दिले असल्यास दिनांक, २२ फेब्रुवारी, २०१९ पासून दोन वर्षामध्ये ( दि. २१ फेब्रुवारी २०२१ पर्यत) वसुल करावे.

## कलम - १४४ - १२ अ

कर्ज माफ करण्याच्या अधिकारावरील निर्बंध.

आजी माजी संचालक व त्याचे नातेवाईक यांचे कर्ज नियामक मंडळ सल्ला घेतलेशिवाय व निबंधकाचे परवानगी शिवाय माफ करणार नाही.

कुटुंब- कलम ७५ च्या पोट कलम २ च्या मधील तरतुदी प्रमाणे.

(पत्नी, पती, वडील, आई, भाऊ, बहीन, मुलगा, मुलगी, जावई किंवा सून)

## कलम - १४४ - १३ अ

नियामक मंडळ.

राज्य शासन राजपत्रातील अधिसुचनेव्दारे या अधिनियमाखाली किंवा या अन्वये नेमून देण्यात येतील अशी कर्तव्य व कार्य पार पाडण्यासाठी नियामक मंडळ गठीत करेल.

दि. ३१ जानेवारी, २०१९ चे अधिसुचनेव्दारे नियामक मंडळ गठीत

## कलम - १४४ - १४ अ

नियामक मंडळ रचना. (सदस्य संख्या- १०)

| | |
|---|---|
| १. निबंधक, | अध्यक्ष |
| २. अपर निबंधकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा अधिकारी, | सदस्य |
| ३. सहकारी बँकेच्या उप महाव्यवस्थापकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसतील असे दोन सेवानिवृत्त अधिकारी. | सदस्य |
| ४. सनदी लेखापाल एक, | सदस्य |
| ५. बिगर कृषि सहकारी पतसंस्थांचे चार प्रतिनिधी. | सदस्य |
| ६. उप निबंधकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा अधिकारी. | सचिव |

## कलम - १४४ - १५ अ

नियामक मंडळाचा सचिव.

उप निबंधकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा अधिकारी निबंधका कडून नियुक्ती करण्यात येईल.

## कलम - १४४ - १६ अ

नियामक मंडळाच्या अशासकीय सदस्यांचा पदावधी.

पदावधी तीन वर्षे

(नियुक्त सदस्यांची फेरनियुक्ती नाही)

Scanned with CamScanner

## कलम - १४४ - १७ अ

अशासकीय सदस्यांचा राजीनामा.

अशासकीय सदस्य नियामक मंडळ, अध्यक्षाकडे राजीनामा देतील. राजीनामा प्राप्त झालेनंतर अमंलबजावणी लगेच होईल.

## कलम - १४४ - २० अ

नियामक मंडळाचे कामकाज चालविण्याची रीत.

नियामक मंडळ बैठक, बैठकीची गणपुर्ती, नियामक मंडळ कामकाज चालविण्याची रीत विहीत करण्यात येईल.त्याप्रमाणे असेल.

## कलम - १४४ - १८ अ

अशासकीय सदस्यांस पदावरुन दूर करणे.

- नादार असल्यास.
- कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली असेल.
- तो विकल मनाचा झालेला असेल.
- सदस्य म्हणून कार्य करण्यास नकार दिल्यास.
- कलम ७३ कअ नुसार अपात्र ठरलेस.

## कलम - १४४ - २१ अ

नियामक मंडळाच्या अशासकीय सदस्यांचे भत्ते.

राज्य शासन वेळोवेळी, राजपत्रात अधिसुचनेव्दारे नियामक मंडळ सदस्यांचे भत्ते स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधीतून देईल.

## कलम - १४४ - १९ अ

नियामक मंडळ नैमितिक रिक्त जागा कशा भराव्यात.

रिक्त जागा जशा होतील तसतशा कलम. १४४-१४ अ मधील वर्गवारी नुसार भरण्यात येतील.

## कलम - १४४ - २२ अ

नियामक मंडळाची कार्ये व अधिकार.

- एका सदस्याकडून घेण्यात येणारी कमाल ठेव रक्कम
- ठेवी व कर्जावरील किमान व कमाल व्याजदर
- सदस्यांच्या कर्जाची अधिकतम मर्यादा
- रोख तरलता निधीची कमाल मर्यादा
- स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधी मधील अंशदान दर ठरविणे
- स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधी वापराबाबत निकष ठरविणे
- प्रशासकिय व आस्थापना खर्चाची मर्यादा

Scanned with CamScanner

नियामक मंडळ पुढील बाबतीत मार्गदर्शक तत्वे घालून देणार.

- अनुत्पादक जिंदगी वर्गिकरण
- कर्मचारी शैक्षणिक पात्रता
- स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधीत अंशदान करता येईल अशा संस्थांची पात्रता निकष
- संस्थांच्या हितासाठी आवश्यक वाटेल अशा बाबीवरील सर्वसाधारण मार्गदर्शक तत्वे

## कलम - १४४ - २३ अ

मार्गदर्शक तत्वे बंधनकारक.

- १४४ - २२ अ नुसार दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन
- तत्वांचे पालन होते किंवा नाही याबाबत निबंधक संस्थेकडून अहवाल मागवू शकेल

## कलम - १४४ - २४ अ

संस्थेस अधिस्थगन किंवा निदेश देणे.

ठेवीदार आणि सदस्यांच्या हितास हानी पोहचेल अशा रितीने संस्था कामकाज सुरू असेल आणि तशी निबंधकाची खात्री पटली तर

संस्थेस म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर अधिस्थगन किंवा निदेश देणेचा अधिकार निबंधकाला असेल

निबंधक काही कालावधी साठी ठेवी काढणे किंवा रोखता, तलरता निधीचे योग्य प्रमाण होईपर्यंत ठेवी स्विकारणे यावरती बंधन आणू शकेल.

संस्थेस निदेश देण्यापुर्वी आपेक्षित आर्थिकस्थिती.

दिनांक. १५ जानेवारी, २०20 चे परिपत्रकानुसार,

१. संस्थेने नियम ३५ चे मर्यादेमध्ये ठेवी स्विकाराव्यात.
२. संस्थेचा सी. डी. रेशो हा ६० ते ७० टक्के या दरम्यान असावा.
३. संस्थेचा ढोबळ एन.पी.ए १० टक्के पेक्षा जास्त नसावा.
४. निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण १ टक्के पेक्षा जास्त असावे.
५. संस्थेचा स्वनिधी हा खेळत्या भांडवलाच्या ५ टक्के पेक्षा अधिक असावा.
६. संस्था नफ्यामध्ये असावी.
७. संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडील कर्जाचे प्रमाण संस्थेच्या एकूण कर्जाच्या ५ टक्के पेक्षा अधिक नसावे.
८. संस्थेने रोखता निधी व तरलता निधीचे उल्लंघन केलेले नसावे,
निकषांचे उल्लंघन केले असल्यास संस्था कारवाईस पात्र.

## कलम - १४४ - २५ अ

स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधी घठीत करणे.

राज्य शासन राजपत्रातील अधिसुचनेव्दार स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधी निर्माण करेल त्यामध्ये खालील बाबींचा समावेश असेल.

- संस्था अंशदान
- देणग्या
- शासन प्राप्त सहाय्य
- सहाय्य परतावा व्याज
- संस्थाना केलेला दंड

## कलम - १४४ - २६ अ

संस्थांचे स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधीमध्ये अंशदान.

नियामक मंडळ राजपत्रातील अधिसुचनेव्दारे अधिसुचित करेल त्याप्रमाणे अंशदान देणे

निधी मध्ये अंशदान दिलेली रक्कम परत मिळणार नाही.

दिनांक. १५ जानेवारी, २०२० चे परिपत्रकानुसार

अंशदान दर ००.०५ टक्के प्रमाणे ३१ मार्च,२०१९ रोजी असलेल्या ठेव रक्कमेवर ३१ मार्च,२०२० पर्यंत नियामक मंडळाकडे जमा करणे बंधनकारक.

Scanned with CamScanner

## कलम - १४४ - २७ अ

स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधीचा वापर.

- कलम १४४ - १० अ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे तरलताप्रमाण राखण्यासाठी पात्र संस्थांना सहाय्य
- राज्य शासनाने योजना लागू करण्याचा दिनांक जाहिर केल्यानंतर अवसायनात घेण्यात येणाऱ्या संस्थेच्या सभासदांची ठेव रक्कम परत करण्यासाठी

## कलम - १४४ - २८ अ

स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधीची गुंतवणूक.

- राष्ट्रीकृत बँक / राज्य बँक / सलग तीन वर्षे अ वर्ग असलेली जिल्हा बँक / २०० कोटी पेक्षा जास्त निव्वळ मत्ता असलेली कोणतिही बँक
- जास्तीत जास्त २० टक्के एका बँकेत गुंतवणूक केली जाईल

## कलम - १४४ - २९ अ

अंशदान तरलता किंवा वित्तीय सहाय्य यांच्या थकबाकीची वसुली.

निबंधक जमीन महसुलीची थकबाकी प्रमाणे

अंशदान तरलता किंवा वित्तीय सहाय्य यांच्या थकबाकीची वसुलीबाबत संस्थेस म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर वसुली प्रमाणपत्र देईल व वसुली करेल.

## कलम - १४४ - ३० अ

निधीचे लेखे आणि लेखापरिक्षण.

नियामक मंडळ सचिव निधीच ठेवतील व नियामक मंडळ नियुक्त लेखापरिक्षक लेखापरिक्षण करेल.

## कलम - १४४ - ३१ अ

शास्ती लावण्याचा निबंधकाचा अधिकार.

अ) १४४ - ५ अ, संस्था सदस्य नसलेल्या व्यक्तीकडून ठेवी स्विकारणे.

१४४ -२४ अ, ठेवीदार आणि सदस्यांच्या हितास बाधा.

शास्ती- ठेवीच्या रक्कमी संबंधात करण्यात आले असेल अशा रक्कमेच्या दुपटीपेक्षा अधिक नसेल इतकी शास्ती (दंड)

ब) १४४ - ९ अ, सी.आर.आर उल्लंघन

१४४ -१० अ, एस.एल.आर उल्लंघन

शास्ती- रूपये- ५० हजारापर्यंत शास्ती

उल्लंघन चालु राहिलेस प्रत्येक दिवसाकरिता रूपये- २५ हजारपर्यंत अतिरिक्त शास्ती वाढविता येईल.

दंड फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ मधील तरतुदी पध्दतीने वसुल.

वसुल दंड स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधीमध्ये जमा

Scanned with CamScanner

## कलम-१४६ प-१) उपराध (बिगर कृषी सहकारी पतसंस्था)

कलम- ४३ व ४४ - कर्ज घेणे व कर्ज देणे धोरण उल्लंघन.
कलम- १४४- ४ अ)- संस्था कामकाजा व्यतिरिक्त इतर कामे.
कलम- १४४- ६ अ)- खरेदी विक्री व्यवहार करणे.
कलम- १४४- ७ अ)- अनावश्यक मालमत्ता विहीत मुदतीत निकाली न काढणे.
कलम- १४४ - ८ अ)- प्रशासनिक व आस्थापना खर्च मर्यादा उल्लंघन.
कलम-१४४-११ अ)- संचालक मंडळ व नातेवाईक कर्ज वाटप.
कलम-१४४-१२अ)- नियामक मंडळ सल्ला व निबंधक परवानगी शिवाय कर्ज माफी देणे.
कलम-१४४-२२अ)- नियामक मंडळ मार्गदर्शक सुचनेचे पालन न करणे.
कलम-१४४-२६ अ)- स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधीत अंशदान न देणे.

शिक्षा- रुपये-२५ हजारापर्यत दंड किंवा तीन वर्षापर्यत कारावास, किंवा दोन्हीही शिक्षा

# धन्यवाद



प्रा. एस.टी.जाधव
तात्यासाहेब मोहिते सहकार प्रशिक्षण केंद्र कोल्हापूर.
मो. नं. ९४२२६३३५२०,९८३४००९१५०

Scanned with CamScanner